# 2.6 सामाजिकदृष्ट्या वंचित वर्गांचा विकास

## अभ्यासक्रम

**2.6 Development for Socially deprived classes (SC, ST, VJ /NT, OBC etc.)**
**सामाजिकदृष्ट्या वंचित वर्गांचा विकास (SC, ST, VJ /NT, OBC etc.)**

- Problems and issues (inequality in opportunity etc.)
  समस्या व मुद्दे (संधीतील असमानता इत्यादी)
- Government Policy, welfare schemes and development programs
  सरकारी धोरण, कल्याणकारी योजना आणि विकासाचे कार्यक्रम
- Role of international agencies, Voluntary Organisations and Resource mobilisation and Community participation.
  आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना आणि संसाधन जमवाजमव व समुदाय सहभागाची भूमिका.

## अनुसूचित जाती
(Scheduled Castes)

**पार्श्वभूमी**

- भारतीय समाजात ऐतिहासिक काळापासून एक कठोर व्यवसायाधारित व उतरंडीची जाती व्यवस्था अस्तित्वात आहे, ज्यामधील सामाजिक वर्गीकरणातील जातींचे तुलनात्मक स्थान त्याच्या पारंपरिक व्यवसायावरून ठरत असे. त्यापैकी 'अस्वच्छ' किंवा तथाकथित 'दूषित' व्यवसाय केवळ 'निम्न' जाती नव्हे तर 'अस्पृश्य' समजल्या गेल्या. अस्पृश्यतेच्या प्रथेमुळे अशा निम्न जातीतील व्यक्तींना प्रचंड अन्यायास सामोरे जावे लागले, कारण सर्व बाबतीत त्यांच्यात भेदभाव केला जात असे. जमिनीसारख्या उत्पादक मालमत्तांवर मालकी हक्क दिला जात नसे, तसेच शिक्षण व समानतेचे मूलभूत हक्क न दिले गेल्याने त्यांचे सामाजिक-आर्थिक मागासलेपण अधिक खोलवर बनत गेले.
- १९३१ च्या जनगणनेमध्ये पहिल्यांदा काही जातींना व्यवस्थितपणे दलित वर्ग (depressed classes) म्हणून वर्गीकृत करण्यात आले. त्यानंतर 'भारत सरकार कायदा, १९३५' ने पहिल्यांदा सामाजिकदृष्ट्या वंचित गटांना 'अनुसूचित जाती' (Scheduled Castes: SCs) म्हणून अधिसूचित करण्याची तरतूद केली व त्यानुसार अशा जातींची एक सूची 'भारत सरकार (अनुसूचित जाती) आदेश, १९३६' मध्ये अधिसूचित करण्यात आली. १९३५ च्या कायद्याच्या आधारे १९३७ मध्ये झालेल्या प्रांतिक निवडणुकांमध्ये अनुसूचित जातींच्या उमेदवारांसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या होत्या.
- २६ जानेवारी, १९५० रोजी अस्तित्वात आलेल्या भारताच्या राज्यघटनेत अस्पृश्यता नष्ट करण्यास आली आणि अनुसूचित जातींसाठी विविध विशेष सुरक्षोपाय प्रदान करण्यात आले, जेणे करून या जाती कमीत कमी कालावधीत इतर सामाजिक गटांबरोबर समानता प्राप्त करू शकतील. या सुरक्षोपायांच्या फलस्वरुप लोकसभा व विधानसभांच्या निवडणुकांमध्ये आरक्षण तसेच सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण प्रदान केले जाऊ शकले.
- सध्या 'सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालय' (Ministry of Social Justice and Empowerment) अनु. जातींचा विकास व सबलीकरणावर लक्ष ठेवण्यासाठी नोडल मंत्रालय आहे. मे, १९९८ मध्ये तात्कालीन 'कल्याण' मंत्रालयांचे रुपांतर या मंत्रालयात करण्यात आले. अनु. जातींच्या विकासाची प्राथमिक जबाबदारी जरी विविध केंद्रीय मंत्रालये आणि राज्य शासन कें. प्र. प्रशासनांची आहे तरी 'सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालया'कडे त्याबाबतीत नोडल जबाबदारी देण्यात आली आहे, आणि हे मंत्रालय त्यांच्या कार्यास स्कॉलरशीप, होस्टेल, सुलभ कर्जे इ. च्या मार्गाने पूरक कार्य करते. हे मंत्रालय केंद्रीय मंत्रालये व राज्य (कें. प्र. सरकारांनी अनु. जातींच्या विकास व सबलीकरणाच्या दृष्टीने केलेल्या प्रयत्नांची पाहणी सुध्दा करते.

## अनुसूचित जातीची व्याख्या (Definition)

- भारताच्या राज्यघटनेत कलम ३६६ (२४) मध्ये अनुसुचित जातींची व्याख्या अशी करण्यात आली आहे की, "या संविधानाच्या प्रयोजनार्थ, कलम ३४१ खाली अनुसूचित जाती असल्याचे मानले गेलेल्या जाती, वंश, किंवा जमाती अथवा अशा जातींचे, वंशांचे किंवा जमातींचे भाग अथवा त्यांतील गट होय."

## एखाद्या जातीचे अनुसूचित जाती म्हणून निर्देशन (Specification)

- एखाद्या जातीचे निर्देशन अनुसूचित जाती म्हणून करण्याची तरतूद घटनेच्या **कलम ३४१** मध्ये पुढीलप्रमाणे देण्यात आली आहे.

i) **कलम (१)** नुसार, "राष्ट्रपतींना कोणत्याही राज्याच्या/केंद्रशासित प्रदेशाच्या बाबतीत आणि ते राज्य असेल तर त्याच्या राज्यपालाचा विचार घेतल्यानंतर जाहीर अधिसूचनेद्वारे या संविधानाच्या प्रयोजनार्थ जाती, वंश अथवा जमाती अथवा त्यांचे भाग किंवा गट त्या राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या संदर्भात अनुसूचित जाती म्हणून विनिर्दिष्ट करता येईल."

ii) **कलम ३४१ (२)** नुसार, 'संसद कायद्याद्वारे कोणतीही जात, वंश किंवा जमात अथवा त्यांचा भाग किंवा त्यातील गट उपकलम (१) खाली काढलेल्या अधिसूचनेतील अनु. जातींच्या यादीमध्ये समाविष्ट करता येईल किंवा तिच्यामधून वगळता येईल.'

- वरील तरतुदींच्या आधारे ६ घटनात्मक आदेश (Constitutional Orders) जारी करण्यात आले असून सध्या २७ राज्ये व ५ केंद्रशासित प्रदेशांमध्ये मिळून **एकूण १२६३ जाती अनु. जाती म्हणून घोषित** करण्यात आल्या आहेत.
- अरुणाचल प्रदेश व नागालँड या राज्यांमध्ये, तर अंदमान-निकोबार बेटे व लक्षद्विप या केंद्रशासित प्रदेशांमध्ये कोणत्याही जातीस अनु. जाती म्हणून घोषित करण्यात आलेले नाही. अनु. जाती म्हणून घोषित करण्यात आलेल्या सर्वाधिक जातींची संख्या कर्नाटक (१०१) व त्याखालोखाल ओडिसामध्ये (९३) मधील आहेत. महाराष्ट्रात ५९ जातींना अनुसूचित जाती म्हणून घोषित करण्यात आले आहे.

## एखाद्या जातीचे अनुसूचित जाती म्हणून निर्देशन करण्याचे निकष व पद्धत

- एखाद्या समुदायास अनु. जातींच्या यादीमध्ये समाविष्ट करण्याचा निकष 'पारंपारीक अस्पृश्यतेच्या प्रथेमुळे निर्माण झालेले अत्याधिक सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणा' हा आहे.
- असा विनिर्देश करण्यासाठी अलिकडे भारत सरकारने जून १९९९ मध्ये विस्तृत पध्दती जाहीर केली. त्यामध्ये जून २००२ मध्ये संशोधन करण्यात आले. ही पध्दत थोडक्यात पुढीलप्रमाणे -

१) अनु. जातींच्या सध्याच्या यादीमध्ये बदल करण्याबाबतचा (एखाद्या जातीचे नाव टाकण्याबाबत किंवा वगळण्याबाबत) संपूर्ण प्रस्ताव राज्यशासन/केंद्रशासित प्रदेशाने वांशिक/नृजातीय पुराव्यासहित (ethnographic support) तयार करणे गरजेचे असते.

२) या प्रस्तावास रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया (RGI) आणि आणि राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने (NCSC) स्वतंत्ररित्या मान्यता दिल्यास त्या प्रस्तावाचे विधेयक घटनेच्या कलम ३४१ (२) अंतर्गत संसदेत विचारार्थ व संमतीसाठी मांडले जाते.

## अनुसुचित जातींसाठी घटनात्मक सुरक्षोपाय
## (Constitutional Safeguards for SCs)

**अ) विकासात्मक व संरक्षणत्मक सुरक्षोपाय :**

- हे सुरक्षोपाय घटनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये असून **कलम ४६** मध्ये सर्वसमावेशक तरतूद आहे व त्यात विकासात्मक तसेच नियामक अशा दोन्ही बाबी आहेत. त्यानुसार "राज्यसंस्था, जनतेतील दुर्बल घटक आणि विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन विशेष काळजीपूर्वक करील, आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यांपासून त्यांचे रक्षण करील."
- या तरतुदींच्या अनुषंगाने भारतीय घटनेमध्ये अनु. जाती व अनु. जमातींच्या सामाजिक-आर्थिक आणि शैक्षणिक विकासासाठी विविध सुरक्षोपायांची तरतूद करण्यात आली आहे.

**ब) सामाजिक सुरक्षोपाय :**

१) **कलम १७ नुसार** "अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोणत्याही स्वरुपातील आचरण निषिध्द करण्यात आले आहे, अस्पृश्यतेतून उद्भवणारी कोणतीही नि:समर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल."

या कलमाच्या अंमलबजावणीसाठी संसदेने **अस्पृश्यता (गुन्हे) कायदा, १९५५** संमत करण्यात आला. त्याच्या तरतुदी अधिक कडक करण्यासाठी १९७६ मध्ये त्यात सुधारणा करण्यात आल्या व त्याचे नाव बदलवून 'नागरी

अधिकार संरक्षण कायदा, १९५५' असे करण्यात आले. या कायद्यात अत्याचाराच्या (atrocities) केसेस समाविष्ट नसल्याने त्यासाठी पुढे **अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार निवारण) कायदा, १९८९** संमत करण्यात आला.

२)**कलम २३ अन्वये,** ''माणसांचा अपव्यापार (traffic) आणि बिगार व त्यासारख्या अन्य स्वरुपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे आणि या तरतुदींचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.''

या कलमात जरी अनु.जातींचा विशेष उल्लेख नसला तरी बहुसंख्य वेठबिगार अनु.जातींतील असल्याने या कलमाचे त्यांच्यासाठी विशेष महत्व आहे. या कलमाच्या आधारे, संसदेने 'वेठबिगार पध्दती (रद्दबातल) कायदा, १९७६' संमत केला आहे. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कामगार मंत्रालय वेठबिगारांची ओळख, सुटका आणि पुनर्वसनासाठी एक केंद्र पुरस्कृत योजना चालवित आहे.

३)**कलम २४ अन्वये,** ''१४ वर्षाखालील कोणत्याही बालकास, कोणत्याही कारखान्यात वा खाणीत काम करण्यासाठी नोकरीस ठेवले जाणार नाही अथवा अन्य कोणत्याही धोक्याच्या कामावर त्यास कामावर लावले जाणार नाही.''

बालकामगारास प्रतिबंध करण्यासाठी केंद्रीय व राज्य कायदे आहेत. हे कलम अनु.जातींसाठी तसेच अनु.जमातींसाठी महत्वाचे आहे, कारण धोक्याची कामे करणाऱ्या बाल कामगारांपैकी एक मोठा गट त्यांपैकी आहे.

४)**कलम २५(२)(b) अन्वये,** ''सार्वजनिक स्वरुपाच्या हिंदू धामिक संस्था हिंदूंच्या सर्व वर्गांना व गटांना खुल्या असतील.'' या कलम प्रयोजनार्थ **हिंदू** या शब्दोल्लेखात शीख, जैन व बौध्द धर्म प्रकट करणाऱ्यांचाही समावेश करण्यात आला आहे.

क)**आर्थिक सुरक्षोपाय** :

- वर उल्लेखिलेल्या कलम २३,२४ आणि ४६ च्या तरतुदी अनु.जातींसाठी विविध आर्थिक सुरक्षोपाय सुध्दा उपलब्ध करुन देतात.

)**शैक्षणिक व सांस्कृतिक सुरक्षोपाय** :

**कलम १५(४),** राज्यसंस्थेस कोणत्याही सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांसाठी किंवा अनु.जाती व अनु.जमातींच्या उन्नतीसाठी कोणतीही विशेष तरतूद करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. १९५१ च्या पहिल्या घटना दुरुस्तीने हे उपकलम टाकण्यात आले होते.

या कलमाच्या आधारे शिक्षणसंस्थांमध्ये अनु.जाती व जातींसाठी जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. हे कलम व कलम १६(४) या कलमांमध्ये वापरण्यात आलेला **मागासवर्ग** हा शब्द एक साधारण संज्ञा (a generic term) म्हणून वापरण्यात आलेला असून त्यात मागासवर्गांच्या विविध गटांचा समावेश होतो, जसे अनु.जाती, अनु.जमाती, इतर मागास वर्ग, विमुक्त जाती आणि भटक्या/अर्धभटक्या जाती.

इ)**राजकीय सुरक्षोपाय** :

ई)**सेवा सुरक्षोपाय**: हे दोन्ही सुरक्षोपाय अनुसूचित जमातींप्रमाणेच आहेत.

## वैधानिक तरतुदी
## (Statutary Provisions)

- वर दिलेल्या घटनात्मक सुरक्षोपायांच्या आधारावर अनु. जातींसाठी काही वैधानिक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. पुढील दोन कायदे विशेषतः अनु.जाती व जमातींप्रती १) अस्पृश्यता आणि २) अत्याचार थांबविण्यासाठी संमत करण्यात आले आहेत.

१)नागरी अधिकार संरक्षण कायदा, १९५५

२)अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार निवारण) कायदा, १९८९

१)**नागरी अधिकार संरक्षण कायदा, १९५५** (Protection of Civil Rights Act, 1955/PCR Act, 1955):

- घटनेच्या कलम १७ च्या आधारे **अस्पृश्यता (अपराध) कायदा,** १९५५ संमत करण्यात आला होता. नंतर १९७६ मध्ये त्यात सुधारणा करण्यात येऊन त्याचे नाव बदलून **''नागरी अधिकार संरक्षण कायदा, १९५५''** असे करण्यात आले. या कायद्याअंतर्गत ''नागरी अधिकार संरक्षण नियम, १९७७'' अधिसूचित करण्यात आले.
- हा कायदा संपूर्ण भारतात लागू असून त्यामध्ये अस्पृश्य प्रथेसंबंधी शिक्षेची तरतूद आहे. या कायद्याची अंमलबजावणी संबंधित राज्य शासन व केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनाद्वारे केली जाते.
- या कायद्यात अस्पृश्यतेच्या आधारावर करण्यात आलेल्या पुढील अपराधांची व्याख्या व त्यांसाठी शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे:

i)सार्वजनिक पुजा स्थळांमध्ये प्रवेश व पवित्र जलस्त्रोतांचा वापर यांस प्रतिबंध

ii)कोणतेही दुकान, सार्वजनिक रेस्टॉरेंट, हॉटेल, सार्वजनिक मनोरंजन, स्मशान घाट, इ. मध्ये प्रवेशास प्रतिबंध.

iii)कोणतेही हॉस्पिटल, डिस्पेन्सरी, शैक्षणिक संस्था इ. मध

प्रवेशास मनाई.

iv)वस्तू विक्री किंवा सेवा प्रदान करण्यास मनाई.

v)छळ,धोका पोहचविणे, अपमान इ.

vi)अस्पृश्यतेच्या आधारावर कोणत्याही व्यक्तीस सफाई, मृत जनावर हटविणे इ. साठी मजबूर करणे.

- या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विविध राज्ये/के.प्र.नी १) कायदेविषयक सहाय्य २) विशेष न्यायालये ३) कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनास मदत करणाऱ्या समित्या, ४) विशेष पोलिस स्टेशन्स इ. ची तरतूद केली आहे.

२)**अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार निवारण) कायदा, १९८९** (Scheduled Castes and Scheduled Tribes (Prevention of Atrocities)Act, 1989):

- हा कायदा (PoA Act) ३० जानेवारी, १९९० पासून अंमलात आला. या कायद्याचे उद्देश )अनु.जाती व जमातींच्या विरुध्द अनु.जाती व अनु.जमातींव्यतिरिक्त इतर व्यक्तींनी केलेले अत्याचाराचे अपराध थांबविणे, )अशा गुन्ह्यांच्या चटल्यांसाठी विशेष न्यायालयांची तरतूद, आणि )पिडीत व्यक्तींचे निवारण व पुनर्वसन करणे, हे आहेत. या कायद्याअंतर्गत सर्वसमावेशक नियम ''अनु.जाती व अनु.जमाती (अत्याचार निवारण) नियम, १९९५'' अधिसूचित करण्यात आले.
- हा कायदा जम्मू व काश्मिर वगळता संपूर्ण भारतास लागू आहे, त्याची अंमलबजावणी राज्य शासन व केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासनामार्फत केली जाते व त्यासाठी 'कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र-पुरस्कृत योजने'अंतर्गत केंद्रीय साहाय्य त्यांना दिले जाते.
- या कायद्यात अत्याचारांची व्याख्या, शिक्षेची तरतूद यांबरोबरच कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्यांत विशेष न्यायालये, विशेष पब्लिक अभियोजक (Prosecutors) राज्य तसेच, जिल्हा स्तरीय सतर्कता आणि पाहणी समिती, नोडल अधिकारी यांचीही तरतूद करण्यात आली आहे.

३)**अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार निवारण) सुधारणा कायदा, २०१५** (Scheduled Castes and Scheduled Tribes (Prevention of Atrocities) Amendment Act, 2015):

- १९८९ च्या कायद्यात प्रतिबंधात्मक तरतुदी असतांनाही अनुसूचित जाती जमातींच्या विरूद्ध होणाऱ्या अत्याचाराच्या घटना थांबू शकल्या नाहीत. म्हणून १९८९ च्या कायद्यात सुधारणा करून 'अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार निवारण) सुधारणा कायदा, २०१५' हा कायदा संमत करण्यात आला. त्याचा अंमल २६ जानेवारी, २०१६ पासून सुरू झाला.
- या कायद्यात काही नवीन गुन्हे समाविष्ट करण्यात आले आहेत. तसेच गुन्ह्यांची व्याप्ती व भरपाई रकम यांमध्ये वाढ करण्यात आली आहे.

## मॅन्युअल स्कॅव्हेंजर व्यक्तींची मुक्तता व पुनर्वसन
(Liberation and Rehabilitation of Manual Scavengers)

- शुष्क शौचालये आणि मॅन्युअल स्कॅव्हेंजिंगच्या (manual scavenging) प्रथेचे संपूर्ण निर्मूलन करणे, आणि त्यांचे पर्यायी व्यवसायांमध्ये पुनर्वसन करणे, हे सरकारचे एक उच्च अग्रक्रमाचे क्षेत्र आहे. त्यासाठी सरकारने एक त्री-आयामी धोरण स्विकारले होते:

१)**''मॅन्युअल स्कॅव्हेंजरांचा वापर आणि शुष्क शौचालय बांधणी (प्रतिबंध) कायदा, १९९३'' ची अंमलबजावणी**: स्वच्छता हा राज्यांचा विषय आहे. मात्र घटनेतील कलम २५२(१) च्या आधारावर संसदेने हा कायदा संमत केला. २३ राज्ये व सर्व केंद्रशासित प्रदेशांनी या कायद्याचा स्विकार केला. हिमाचल प्रदेश व राजस्थानचे स्वतःचे कायदे आहेत. मिझोराम व मणीपूर यांनी शुष्क शौचालय व स्कॅव्हेंजर नसल्याचे घोषित केले. केवळ जम्मू-काश्मीरने हा कायदा स्विकारलेला नाही. या कायद्याच्या प्रशासनाची जबाबदारी 'गृहनिर्माण व शहरी दारिद्र्य निर्मूलन' मंत्रालयाकडे होती.

२)**शुष्क शौचालयांचे रुपांतर वॉटर सील्ड शौचालयांमध्ये करणे**: त्यासाठी १९८०-८१ पासून शहरी भागासाठी 'एकात्मिक निम्न खर्च स्वच्छता योजना' (Integrated Low Cost Sanitation Scheme) चालविली जात होती. ग्रामीण भागात १९९९ पासून 'संपूर्ण स्वच्छता अभियान' चालविले जात होते.

३)**मॅन्युअल स्कॅव्हेंजरांचे पुनर्वसन** त्यासाठी मार्च, १९९२ पासून एक 'राष्ट्रीय स्कॅव्हेंजर्स व त्यांच्या आश्रितांची मुक्तता व पुनर्वसन योजना', तर जानेवारी २००७ पासून 'मॅन्युअल स्कॅव्हेंजर्सच्या पुनर्वसनासाठी स्वयंरोजगार योजना' राबविली जात होती.

**मॅन्युअल स्कॅव्हेंजर म्हणून रोजगारास प्रतिबंध आणि त्यांचे त्यांचे पुनर्वसन कायदा, २०१३** (The Prohibition of Employment as Manual Scavengers and their Rehabilitation Act, 2013)

●वरील उपाययोजना केलेल्या असतांनाही मॅन्युअल स्कॅव्हेंजिंगची पद्धत थांबू शकली नाही. त्यामुळे सरकारने त्यासाठी अधिक कडक तरतूद करणारा हा कायदा पारित केला. तो ६ डिसेंबर, २०१३ पासून अंमलात आला.

●या कायद्याची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:

i)अस्वच्छ शौचालयांची ओळख आणि निर्मूलन.

ii)मॅन्युअल स्कॅव्हेंजरांच्या रोजगारास प्रतिबंध आणि गटारी व सेप्टीक टॅंक्स यांच्या घातक हातसफाईस प्रतिबंध.

●या कायद्यान्वये, कोणताही व्यक्ती, स्थानिक प्राधिकारी किंवा कोणतीही एजन्सी कोणत्याही व्यक्तीस गटारींची किंवा सेप्टीक टॅंक्सची घातक हातसफाई करण्यासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कामावर ठेवणार नाही. याचे उल्लंघन केल्यास अटक आणि/किंवा दंड याची तरतूद करण्यात आली आहे.

**<u>मॅन्युअल स्कॅव्हेंजरांच्या पुनर्वसनासाठी स्वयंरोजगार योजना</u>** (Self-Employment Scheme for the Rehabilitation of manual Scavengers: SRMS)

●ही योजना जानेवारी २००७ मध्ये सुरू करण्यात आली होती. तिच्यामध्ये नोव्हेंबर २०१३ मध्ये संशोधन करण्यात आले. नवीन योजनेंतर्गत मॅन्युअल स्कॅव्हेंजरांचे स्वयंरोजगाराद्वारे पुनर्वसन करण्यासाठी पुढील लाभ दिले जातात:

i)पात्र मॅन्युअल स्कॅव्हेंजरांना ४०,००० रूपयांचे रोख सहाय्य.

ii)प्रकल्प खर्चासाठी १५ लाख रूपयांपर्यंतचे कमी व्याज दराने कर्ज.

iii)३,२५,००० रूपयांपर्यंत पात-आधारित भांडवल अनुदान.

iv)दोन वर्षांपर्यंतच्या कालावधीचे कौशल्य विकास प्रशिक्षण, त्यासाठी ३,००० रू. प्रति माह विद्यावेतन.

●ही योजना 'राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळा' मार्फत राबविली जाते.

## <u>अनुसूचित जातींच्या कल्याणाच्या योजना व कार्यक्रम</u>
## (Schemes for SC Welfare)

●अनु. जातींच्या विकासाचा मुख्य भर अनु. जातींचे (अ) शैक्षणिक सबलीकरण (ब) आर्थिक सबलीकरण आणि (क) सामाजिक सबलीकरणाच्या योजनांवर आहे.

### अ)<u>शैक्षणिक सबलिकरणाच्या योजना</u>

**)<u>पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशीप</u>** (Post-Matric Scholarship):

●भारत सरकार १९४४-४५ पासून अनु. जातींच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर स्कॉलरशीप योजना राबवित आहे.

●<u>उद्देश</u>: मॅट्रिकनंतर किंवा माध्यमिक स्तरानंतर शिक्षण चालू ठेवून पूर्ण करता यावे यासाठी अनु. जातींच्या विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य देणे.

●योजनेत डिसेंबर २०१० मध्ये संशोधन करण्यात आले होते व सध्या १ जुलै, २०१० पासून सुधारित योजना लागू आहे.

●<u>**वैशिष्ट्ये**</u> :

१)वित्तीय साहाय्यांमध्ये देखभाल भत्ता, शैक्षणिक संस्थांनी आकारलेल्या परत न केल्या जाणाऱ्या अनिवार्य शुल्कांची प्रतिपूर्ती, बुक बॅंक सुविधा व इतर भत्त्यांचा समावेश होतो.

२)स्कॉलरशीप भारतातील शिक्षणासाठीच प्राप्त होते व राज्य शासनाच्या माध्यमातून दिली जाते.

३)२०१३ पासून सर्व स्त्रोतांपासून २.५ लाख रुपयांपर्यंत कौटुंबिक उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलामुलींनाच ही स्कॉलरशीप दिली जाते. तसेच त्यासाठी कोर्सेसचे चार गटांत वर्गीकरण करण्यात आले आहे.

४)सहसा स्कॉलरशीप रोख स्वरुपात न देता पोस्ट ऑफिस/बॅंक खाते आणि स्मार्ट कार्डाच्या माध्यमातून दिली जाते.

**२)<u>सफाई आणि आरोग्यास धोके असलेल्या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींच्या मुलांसाठी मॅट्रिकपूर्व स्कॉलरशीप</u>** (Pre-Matric Scholarship to the Children of those engaged in occupations involving cleaning and prone to health hazards):

●<u>उद्देश</u>: ही केंद्र-पुरस्कृत योजना १९७७-७८ पासून सुरु करण्यात आली. प्रथम ही योजना होस्टेलमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच होती. नंतर १९९१ पासून इतरांसाठीही (day scholars) सुरु करण्यत आली. या योजनेअंतर्गत पुढील लक्ष्य गटांतील व्यक्तींच्या मुलांना मॅट्रिकपूर्व स्कॉलरशीप दिली जाते: i)शुष्क शौचालयांची सफाई करणारे, ii) परंपरेने सफाईशी संबंधित कर्मचारी, iii) टॅनर्स, iv) फ्लेयर्स, v) मॅनहोल आणि खुल्या गटारी साफ करणारे व्यक्ती, vi)कचरा गोळा करणारे.

●<u>**वैशिष्ट्ये**</u>:

१)योजना राज्य सरकारांमार्फत राबविली जाते.

२)योजना १ ते १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी असून तिच्यासाठी उत्पन्नाचे तसेच जातीचे कोणतेही बंधन नाही.

३)योजनेमध्ये मासिक स्कॉलरशीप (१० महिन्यांसाठी) आणि वार्षिक अनुदान (युनिफॉर्म, स्टेशनरी इ. साठी) याची तरतूद आहे.

३) **नववी व दहावीमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या गरजू विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व स्कॉलरशीप** (Pre-Matric Scholarship for needy SC Students studying in Classess IX & X)

**उद्दिष्टे** :

i) नववी व दहावीमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना मदत करणे, जेणे करून गळतीचें प्रमाण कमी होऊ शकेल.

ii) या विद्यार्थ्यांचा नववी आणि दहावीमधील सहभाग वाढविणे, जेणे करून ते मॅट्रिकोत्तर शिक्षण चालू ठेऊ शकतील.

**वैशिष्ट्ये व पात्रता** :

i) ही केंद्र-पुरस्कृत योजना असून ती राज्य शासनांच्या माध्यमातून चालविली जाते. त्यासाठी त्यांना १०० टक्के केंद्रीय सहाय्य प्राप्त होते.

ii) विद्यार्थ्याच्या जन्मदात्याचे/पालकांचे उत्पन्न २ लाख रूपयांपेक्षा जास्त असू नये.

iii) त्याला दुसरी कोणतीही मॅट्रिकपूर्व स्कॉलरशीप मिळत नसावी.

iv) योजनेमध्ये मासिक स्कॉलरशीप (१० महिन्यांसाठी) आणि वार्षिक अनुदान (युनिफॉर्म, स्टेशनरी इ. साठी) याची तरतूद आहे.

४) **अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय फेलोशीप** (National Fellowship for SC Students):

- भारत सरकाने ही योजना २००५-०६ मध्ये सुरु केली होती. एप्रिल २०१० मध्ये तिच्यामध्ये बदल करण्यात आला.
- **उद्देश**: अनु. जातींतील विद्यार्थ्यांना भारतीय विद्यापीठे, संशोधन संस्था व वैज्ञानिक संस्थांमध्ये एम.फिल व पी.एच.डी. सारखे संशोधनस्तरिय उच्च शिक्षण घेता येण्यासाठी त्यांना वित्तीय साहाय्याच्या स्वरुपात फेलोशीप उपलब्ध करून देणे. ही फेलोशीप विज्ञान, ह्युमॅनिटीज, सामाजिक विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान या विषयांमध्ये दिली जाते.
- **वैशिष्टये** :

१) योजनेच्या अंमलबजावणीसाठी UGC ही नोडल एजन्सी आहे. UGC ने मान्यता दिलेल्या सर्व विद्यापीठे/संस्थांमध्ये ही योजना चालविली जाते.

२) योजनेअंतर्गत प्रति वर्ष २००० फेलोशीपस देण्याची तरतूद आहे. सुरुवातीला विद्यार्थ्यांना दोन वर्षांची JRF (२५,००० रू. प्रति माह) प्रदान केली जाते. त्याची प्रगती चांगली असल्यास त्यास पुढील ३ वर्षांसाठी SRF (२८,००० रू. प्रति माह) प्रदान

५) **अनुसूचित जातींसाठी राष्ट्रीय ओव्हरसीज स्कॉलरशीप** (National Overseas Scholarship for SCs):

- ही योजना १९५४-५५ पासून चालविली जाते.
- उद्देश : अनु. जातींबरोबरच विमुक्त/भटक्या/अर्ध-भटक्या जाती, भूमिहिन शेतमजूर आणि पारंपरिक कारागीर यांच्या निवडक विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि विज्ञान क्षेत्रांतील काही ठराविक कोर्सेसचे परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी (मास्टर्स, डॉक्टरल व पोस्ट-डॉक्टरल स्तरांवरील) वित्तीय साहाय्य उपलब्ध करून देणे.
- **वैशिष्टये** :

१) दरवर्षी १०० विद्यार्थ्यांना ही स्कॉलरशीप दिली जाते. स्कॉलरशीप पदव्युत्तर कोर्ससाठी ३ वर्षे, तर पी.एच.डी. कोर्ससाठी ४ वर्षे दिली जाते. स्कॉलरशीप पदवी शिक्षणासाठी दिली जात नाही.

२) विद्यार्थ्याचे वय ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे. त्याचे किंवा त्यांच्या पालकांचे मासिक उत्पन्न ५०,००० रुपयांपेक्षा जास्त नसावे.

३) स्कॉलरशीप इंजिनिअरिंग, मॅनेजमेंट, शुध्द विज्ञान, कृषि विज्ञान, व वैद्यकशास्त्र या क्षेत्रांसाठी दिली जाते.

४) अनु. जातींबरोबरच विमुक्त जाती, भटक्या/अर्ध-भटक्या जाती, भूमीहिन शेतमजूर, पारंपारिक कारागीर यांनासुध्दा ही योजना लागू आहे.

५) वरील जातींच्या कुटुंबांतील एका पालकांच्या दोनच मुलांना स्कॉलरशीप प्राप्त होते.

६) ३०% स्कॉलरशीप्स महिलांसाठी राखीव आहेत.

७) परदेशी विद्यापीठात/संस्थेत प्रवेशाची व्यवस्था विद्यार्थ्यांस स्वतः करावी लागते.

६) **बाबू जगजीवन राम छात्रावास योजना** (Babu Jagjivan Ram Chhatrawas Yojna):

- अनु. जातींमधील मुलींसाठी होस्टेल बांधण्याची योजना तिसऱ्या योजनेत सुरु करण्यात आली होती. पुढे १९८९-९० पासून अनु जातींमधील मुलांसाठीसुध्दा एक योजना सुरु करण्यात आली. १० व्या योजनेत या दोन्ही योजना एकत्रित करण्यात आल्या जानेवारी, २००८ पासून तिचे नाव बदलून 'बाबू जगजीवनराम छात्रावास योजना' असे करण्यात आले.
- **उद्देश**: उच्च प्राथमिक, माध्यमिक, कॉलेज व विद्यापीठ स्तराव नवीन होस्टेलचे बांधकाम किंवा सध्याच्या होस्टेलचा विस्ता करण्यासाठी आर्थिक साहाय्य उलपब्ध करून देणे व त्याद्व अनु. जातीच्या मुलामुलींना होस्टेलची सुविधा उपलब्ध करु देणे.

● **वैशिष्ट्ये :**

१) या योजनेअंतर्गत राज्य शासन/कें. प्र. प्रशासन, तसेच केंद्रीय व राज्य विद्यापीठे/संस्था यांना नवीन होस्टेल बांधणी व जुन्या होस्टेलच्या विस्तारासाठी केंद्रीय साहाय्य दिले जाते. NGOs व अभिमत विद्यापीठांना केवळ जुन्या होस्टेलच्या विस्तारासाठी केंद्रीय साहाय्य दिले जाते.

२) राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश प्रशासन, केंद्रीय विद्यापीठ आणि राज्य विद्यापीठ/संस्था यांना मुलांच्या होस्टेलसाठी अनुक्रमे ५०:५०, १०० टक्के, ९०:१० आणि ४५:४५:१० या प्रमाणात, तर मुलींच्या होस्टेलसाठी १०० टक्के या प्रमाणात सहाय्य दिले जाते.

३) होस्टेलची जागा राज्य शासनाने/केंद्रशासित प्रदेशाने मोफत पुरवावी लागते.

४) योजनेमध्ये होस्टेल चालविण्यासाठी आवश्यक आवर्ती खर्चाची तरतूद नाही.

**७) अनुसूचित जाती व इतर मागास वर्गीयांसाठी मोफत कोचिंग** (Free Coaching for SC and OBC Students):

● दुर्बल घटकांचा वेगाने आर्थिक विकास होऊन राष्ट्रीय मुख्य प्रवाहात त्यांचे एकात्मिकरण होण्याच्या उद्दिष्टाने त्यांच्या कौशल्ये व क्षमतांमध्ये सुधारणा व्हावी म्हणून ६व्या योजनेपासून अनु. जातींच्या मुलांना मोफत कोचिंगची योजना सुरु करण्यात आली.

● सप्टेंबर २००१ पासून अनु. जाती, इतर मागास वर्ग व अल्पसंख्यांकांसहित दुर्बल घटकांसाठी कोचिंग व संलग्न साहाय्य नावाची एक एकत्रित योजना सुरु करण्यात आली. मात्र एप्रिल, २००७ पासून या केंद्र-पुरस्कृत योजनेत बदल करण्यात येऊन तिचे नाव 'अनु. जाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मोफत कोचिंगची केंद्रीय योजना' असे करण्यात आले.

● **उद्देश:** या योजनेचा उद्देश विविध स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्वक कोचिंग प्रदान करणे हा आहे. ही कोचिंग पुढील प्रकारच्या स्पर्धा परीक्षांसाठी प्राप्त होते: संघ लोक सेवा आयोग, स्टाफ सिलेक्शन कमिशन, रेल्वे भरती बोर्ड, राज्य लोकसेवा आयोग, बँका/विमा कंपन्या/सार्वजनिक उपक्रम यांच्या ऑफिसर ग्रेड परीक्षा, इंजिनिअरिंग/मेडिकल/मॅनेजमेंट/विधी इत्यादी कोर्सेसच्या प्रिमियर प्रवेश परीक्षा,,, यांसारख्या पात्रता परीक्षा इत्यादी.

**वैशिष्ट्ये :**

१) ही कोचिंग राज्य शासन/कें. प्र. प्रशासन, विद्यापीठे (केंद्रीय, राज्य व अभिमत) आणि खाजगी क्षेत्रातील संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या कोचिंग संस्थांच्या माध्यमातून दिली जाते.

२) कोचिंग केंद्रे, त्यांची फी संरचना, विद्यार्थ्यांसाठी राहण्याचे विद्यावेतन इ. सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालयाच्या एका समितीमार्फत ठरविले जाते. विद्यार्थ्यांची निवड कोचिंग केंद्राने करावयाची असते.

३) परीक्षेसाठी पूर्व व मुख्य परीक्षा असेल तर विद्यार्थ्याला या दोन्ही परीक्षांसाठी महत्तम दोनदा मोफत कोचिंग घेता येते.

४) स्थानिक विद्यार्थ्यांना २,५०० रू., तर बाहेरील विद्यार्थ्यांना ५,००० रू. प्रति माह स्टायपेंड दिले जाते.

५) ६ लाखापेक्षा कमी कुटुंब उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ मिळतो.

६) योजनेंतर्गत अनुसूचित जाती व इतर मागास वर्गाच्या विद्यार्थ्यांना कोचिंग देण्याचे प्रमाण ७०:३० असे आहे.

**८) अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे गुणवत्ता दर्जावर्धन** (Upgradation of Merit of SC Students):

● पूर्वीपासून सुरु असलेल्या या योजनेमध्ये १९९८-९९ मध्ये संशोधन करण्यात आले.

● **उद्देश:** ९ वी ते १२ वी तील अनु. जातींच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे दर्जावर्धन करणे. त्यासाठी निवासी शाळांमधील शिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी त्यांच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे.

● **वैशिष्ट्ये :**

१) ही १००% केंद्र पुरस्कृत योजना आहे. त्याअंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्यामागे एका वर्षाला २५,००० रू. अनुदान दिले जाते. निःक्षम विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त विशेष अलाऊन्स प्राप्त होतो.

२) योजनेअंतर्गत ९ वी ते १२ वी तील अनु. जातींमधील विद्यार्थ्यांना उपायात्मक व विशेष कोचिंग उपलब्ध करून दिली जाते. उपायात्मक (remedial) कोचिंग विद्यार्थ्यांची शालेय विषयांमधील कमतरता दूर करण्यासाठी दिली जाते, तर विशेष कोचिंग विद्यार्थ्यांना मेडिकल व इंजिनिअरिंगसारख्या व्यावसायिक कोर्सेसमध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यक स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी दिली जाते.

**९) अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी उच्च दर्जा शिक्षणाची स्कॉलरशीप योजना** (Scholarship Scheme of Top Class Education for SC Students):

● ही योजना २१ जून, २००७ पासून सुरु करण्यात आली.

● **उद्देश:** अनु. जातींमधील विद्यार्थ्यांना १२ वी नंतर शिक्षण चालू ठेवण्यासाठी पूर्ण वित्तीय साहाय्य देऊन त्यांच्यामध्ये गुणवत्तेच्या शिक्षणास प्रोत्साहन देणे.

## महाराष्ट्र शासनाच्या शुल्क सवलती

• शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या सहभागाला उत्तेजन देण्यासाठी आणि पालकांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी राज्य शासन विविध योजनांद्वारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कात विविध सवलती देते.

१)आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण.

२)१ ली ते ८ वी इयत्तेतील गरीब मुलांना मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविणे.

३)१ ली ते १० वी च्या शासन अनुदानित तसेच विनाअनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण सुल्कात सवलत देणे– या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे कमीत कमी १५ वर्षे महाराष्ट्रात वास्तव्य असणे आवश्यक आहे. या योजनेंतर्गत अनुदानित शाळांना सत्रशुल्क व प्रवेश शुल्काची प्रतिपूर्ती (compensation) करण्यात येते, तर विनाअनुदानित शाळांना शिच्ण शुल्क, सत्र शुल्क व प्रवेश शुल्काची प्रतिपूर्ती केली जाते.

४)**आदिवासी विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्ता**: या योजनेंतर्गत ५ वी ते १० वी तील आदिवासी विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी सरासरी ५०० रू.इतका उपस्थिती भत्ता देण्यात येतो.

• वैशिष्ट्ये:

१)देशात १७५ संस्थांची निवड उच्च दर्जा संस्था (Top Class Institutes) म्हणून करण्यात आली आहे. त्यांमध्ये IITs, IIMs, NITs,कमर्शिअल पायलट ट्रेनिंग संस्था, प्रतिष्ठित मेडिकल/विधी व इतर संस्थांचा समावेश आहे. या संस्थांमध्ये प्रवेश प्राप्त करणाऱ्या १,२५० विद्यार्थ्यांना दरवर्षी ट्युशन फी व इतर नॉन-रिफंडेबल चार्जेस, जगण्याचा खर्च, पुस्तके, संगणक इत्यादी कारणांसाठी स्कॉलरशीप दिली जाते.

२)ज्यांच्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ४.५ लाख रु. प्रति वर्षापेक्षा कमी आहे, अशा अनु. जातींमधील विद्यार्थ्यांना ही स्कॉलरशीप दिली जाते.

३)वरील संस्थांमध्ये प्रवेश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना कोर्स पूर्ण होईपर्यंत स्कॉलरशीप दिली जाते.

१०)**शिक्षण व रोजगारात आरक्षण** (Reservation):

**शिक्षणामध्ये आरक्षण** :

• 'केंद्रीय शिक्षण संस्था (प्रवेशात आरक्षण)अधिनियम, २००६' २००८-०९ च्या शैक्षणिक वर्षापासून जारी झाला आहे. या कायद्याद्वारे केंद्रीय शिक्षण संस्थांमध्ये (काही अपवाद वगळता) अनुसूचित जातींसाठी १५ टक्के, अनुसूचित जमातींसाठी ७.५ टक्के, तर इतर मागास वर्गांसाठी (क्रिमी लेयर वगळता)२७ टक्के आरक्षण प्रदान करण्यात आले आहे.

**रोजगारामध्ये आरक्षण** :

• २१ सप्टेंबर, १९४७ रोजी गृह मंत्रालयाने जारी केलेल्या सूचनेद्वारे अनुसूचित जातींसाठी खुल्या स्पर्धेद्वारे होणाऱ्या सरळ भरतीसाठी १२.५ टक्के, तर खुल्या स्पर्धेव्यतिरिक्त होणाऱ्या इतर भरतीसाठी १६.६६ टक्के आरक्षण प्रदान करण्यात आले.

• अनुसूचित जातींच्या लोकसंख्येत वाढ झाल्याने आरक्षणात वाढ करण्याची गरज निर्माण झाली. १९६१ च्या जनगणनेने अनुसूचित जातींचे एकूण लोकसंख्येत प्रमाण १४.७ टक्के असल्याचे दर्शविले. त्यानुसार, २५ मार्च, १९७० रोजी अनुसूचित जातींसाठी खुल्या स्पर्धेद्वारे होणाऱ्या सरळ भरतीसाठी आरक्षण १२.५ टक्क्यांहून १५ टक्के करण्यात आले. खुल्या स्पर्धेव्यतिरिक्त होणाऱ्या इतर भरतीसाठी आरक्षण १६.६६ टक्के इतके राखण्यात आले. सार्वजनिक भरतीबाबत अनु.जाती व जमाती आरक्षण प्रमाण तेव्हापासून बदलण्यात आलेले नाही.

### ब)आर्थिक सबलिकरणाच्या योजना

१)**अनुसूचित जाती उपयोजनेसाठी विशेष केंद्रीय सहाय्य**(Special Central Assistance to SC Sub-Plan):

• ही १९८० मध्ये सुरू करण्यात आलेली एक केंद्र-पुरस्कृत योजना आहे, जिच्याअंतर्गत राज्य/केंद्रशासित प्रदेशांसाठी त्यांच्या अनुसूचित जाती उपयोजनेसाठी १०० टक्के अनुदान दिले ज

• उद्देश: या योजनेचा मुख्य उद्देश अनुसूचित जातीच्या लोकसंख दारिद्र्य रेषेवर आणण्यासाठी स्वयंरोजगार किंवा प्रशिक्षणा माध्यमातून त्यांचा आर्थिक विकास घडवून आणणे, हा अ

**वैशिष्ट्ये** :

i)योजनेंतर्गत प्रत्येक लाभार्थ्याला प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के कि महत्तम १०,००० रू. अनुदान दिले जाते.

ii)राज्याला दिलेल्या केंद्रीय सहाय्यापैकी १० टक्के रक्कम टक्क्यापेक्षा अधिक अनुसूचित जातींची लोकसंख्या असले गावांमध्ये पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर, १५ टक्के अनुसू जातींच्या महिलांसाठी, ५ टक्के अनुसूचित जातींच्या नि व्यक्तींसाठी, १० टक्के रक्कम कौशल्य विकास कार्यक्रमां वापरण्याचे बंधन आहे.

**२)राज्य अनुसूचित जाती विकास महामंडळांना मदत** (Assistance to State SC Development Corporations):

- राज्य अनुसूचित जाती विकास महामंडळांच्या भागभांडवलात ४९:५१ च्या प्रमाणात भागिदारी करण्याची ही केंद्र-पुरस्कृत योजना १९७९ मध्ये सुरू करण्यात आली. सध्या २७ राज्ये/केंद्रशासित प्रदेशांत राज्य अनु.जाती विकास महामंडळे कार्यरत आहेत.
- राज्य अनुसूचित जाती विकास महामंडळांच्या प्रमुख कार्यांमध्ये पुढील प्रमुख कामांचा समावेश होतो- i)पात्र अनुसूचित जातींच्या परिवारांची ओळख करून त्यांना आर्थिक विकास योजनांचा स्विकार करण्यासाठी प्रोत्साहित करणे, ii)वित्तीय संस्थांच्या योजनांना पुरस्कृत करून त्यांना कर्ज मदत करणे, iii)कमी व्याज दराच्या मार्जिन रकमेच्या स्वरूपात वित्तीय मदत करणे आणि कर्जपरतफडीचे दायित्व कमी करणे, iv)दारिद्रय निर्मूलन कार्यक्रमांमध्ये आवश्यक योगदान करणे.
- ही राज्य महामंडळे रोजगाराभिमुख योजनांना वित्तपुरवठा करतात, ज्यांमध्ये कृषि व संलग्न कामे, लघु उद्योग, वाहतूक आणि व्यापार आणि सेवा क्षेत्रांचा समावेश होतो.

**केंद्रीय क्षेत्र योजना** (Central Sector Schemes):

१)राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (NSCFDC) ची स्थापना

२)राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ (NSKFDC) ची स्थापना (या दोन्ही महामंडळांची माहिती पुढे दिलेली आहे.)

३)मॅन्युअल स्कॅव्हेंजर्सच्या पुनर्वसनासाठी स्वयंरोजगार योजना (या योजनेची माहिती पूर्वी देण्यात आली आहे)

४)अनुसूचित जातींना संस्थात्मक कर्ज पुरवठा: रिझर्व्ह बँक दरवर्षी व्यापारी बँकांसाठी अग्रक्रम कर्ज पुरवठ्याचे लक्ष्य ठरवून देते. अनुसूचित जाती व जमातींना बँकांनी केलेला कर्ज पुरवठा अग्रक्रम कर्ज पुरवठ्याच्या 'दुर्बल घटकांना कर्जे' या उपगटात येतो.

## क)सामाजिक सबलिकरणाच्या योजना

**१)नागरी अधिकार संरक्षण कायदा, १९५५ आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार निवारण) कायदा, १९८९ या कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी राज्ये/कें.प्र. ना मदत:**- ही मदत विशेष पोलीस स्टेशन्स, विशेष न्यायालये इत्यादींना केंद्रीय साहाय्य, जाणीव निर्मिती, आंतर-जातीय विवाहांना प्रोत्साहन, अत्याचार पिडितांना मदत, इत्यादी स्वरूपात केली जाते.

**केंद्रीय क्षेत्र योजना :**

**१)स्वयंसेवी संघटनांना साहाय्यक अनुदाने** (Grants-in-aid to VOs):

- १९५३-५४ पासून ही योजना राबविली जाते. अलिकडे १ एप्रिल, २०१४ पासून नवीन संशोधित योजना राबविली जात आहे.
- या योजनेचा उद्देश स्वयंसेवी व इतर संघटनांच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, व्यावसायिक शिक्षण यांसारख्या सेवांची कमतरता असलेल्या अनुसूचित जातीबहूल प्रदेशांमध्ये ही कमतरता भरून काढणे, तसेच सरकारी विकासात्मक पुढाकारांची पोहोच वाढविणे, आणि अनुसूचित जातींच्या सामाजिक-आर्थिक उत्थान आणि व्यापक विकासासाठी पर्यावरण उपलब्ध करून देणे, हा आहे.
- या योजनेंतर्गत पात्र स्वयंसेवी संस्थांना प्रकल्प खर्चाच्या ९० टक्क्यांपर्यंत वित्तीय साहाय्य भारत सरकारकडून प्राप्त होते. योजनेसाठी ३९ क्षेत्रांतील प्रकल्प, विशेषत: शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातील, ग्राह्य मानण्यात आले आहे, उदा. मोबाईल डिस्पेन्सरी, निवासी/गैर-निवासी शाळा, हॉस्पिटल, कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर इत्यादी.

**२)गैर-सरकारी संघटनांना आणि मानवाधिकार कार्यकर्त्यांना अत्याचाराचा विरोध आणि अस्पृश्यता निवारण क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्याबाबत राष्ट्रीय पुरस्कार:**

- सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालयाने २००६ मध्ये राष्ट्रीय पुरस्कारांची स्थापना केली:- २ लाख रुपयांचे पुरस्कार वैय्यक्तिक कार्यकर्त्यांना, तर ५ लाख रुपयांचे पुरस्कार गैर-सरकारी संघटनांना.

**३)अनुसूचित जातीच्या उद्योजकांसाठी IFCI व्हेंचर कॅपिटल फन्ड** (IFCI Venture Capital Fund for Entreprenures):

- अनुसूचित जातीच्या व्यक्तींमध्ये उद्योजकतेचा विकास होण्यासाठी १६ जानेवारी, २०१५ रोजी ने हा व्हेंचर कॅपिटल फन्ड सुरू केला. हा केंद्र सरकारचा एक सामाजिक क्षेत्र पुढाकार आहे.
- अनुसूचित जातीच्या व्यक्तींची किमान ६० टक्के भागीदारी असलेल्या कंपन्यांना या फन्डमधून वित्तीय साहाय्य दिले जाईल. ५ कोटीपर्यंतच्या प्रकल्प गुंतवणुकीपैकी ७५टक्के, तर ५ कोटीपेक्षा अधिक प्रकल्प गुंतवणुकीपैकी ५० टक्क्यांपर्यंत वित्तीय साहाय्य या फन्डमधून दिले जाईल.

**४)अनुसूचित जातींसाठी पत वाढ हमी योजना** (Credit Enhancement Guarantee Scheme for SCs):

- ६ मे, २०१५ रोजी सुरू केलेला हा सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालयाचा सामाजिक क्षेत्र पुढाकार आहे.
- उद्देश: अनुसूचित जातीच्या उद्योजकांना बँका व वित्तीय संस्थांनी कर्जे देणे सुलभ व्हावे यासाठी या बँका व वित्तीय संस्थांना पत हमी देणे.
- त्यासाठी २०० कोटी रूपयांचा कॉर्पस स्थापन करण्यात आला आहे. IFCI Ltd ही या योजनेची नोडल एजन्सी असून तिच्यामार्फत बँका व वित्तीय संस्थांना पत हमी दिली जाईल.
- या योजनेंतर्गत २५ लाख व त्यापेक्षा अधिक कर्जासाठी महत्तम ५ कोटी रूपयांच्या हमीचे कव्हर उपलब्ध आहे.

**प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना** (Pradhan Mantri Adarsh Gram Yojana: PMAGY)

- अनुसूचित जाती लोकसंख्या ५० टक्क्यांहून अधिक असलेल्या गावांचा विकास करण्याच्या दृष्टीने २००९-१० मध्ये पाच राज्यांमधील १००० गावांमध्ये ही योजना प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात आली होती. २२ जानेवारी, २०१५ रोजी योजनेचा विस्तार करून १३ राज्यांतील अजून १५०० गावांमध्ये ती लागू करण्यात आली. सध्या ती १७ राज्यांतील २५०० गावांमध्ये राबविली जात आहे.

**उद्दिष्टे :**

- या योजनेचा उद्देश ५० टक्क्यांहून अधिक अनुसूचित जातीच्या व्यक्तींची लोकसंख्या असलेल्या निवडक गावांचा एकात्मिक विकास 'मॉडेल गावां'मध्ये करण्याचे सुनिश्चित करणे, हा आहे, जेणे करून,

१)त्या गावांमध्ये त्यांच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी सर्व भौतिक व सामाजिक पायाभूत सुविधा उपलब्ध असतील.

२)अनुसूचित जाती व गैर-अनुसूचित जाती यांच्या दरम्यानची पुढील सामाजिक-आर्थिक निर्देशकांबाबतची विषमता नष्ट होईल: साक्षरता दर, प्राथमिक शिक्षण पूर्ण होण्याचा दर, अर्भक मृत्यू दर/माता मृत्यू दर, उत्पादक मालमत्तेची मालकी इत्यादी. तसेच ही निर्देशके राष्ट्रीय सरासरीइतकी उंचावणे. तसेच,

i)सर्व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना, विशेषतः अनुसूचित जातींच्या, अन्न व उपजिविकेची सुरक्षा असेल, आणि दारिद्र्य रेषा पार करून पुरेशी उपजिवीका कमविण्यासाठी ते सक्षम बनतील,

ii)सर्व बालके किमान ८ वर्षांचे शिक्षण पूर्ण करू शकतील, आणि

iii)कुपोषणाचे, विशेषतः महिला व बालकांमधील, निर्मूलन होईल.

३)महिला/बालिकांविरूद्ध भेदभाव, मद्यपान, अंमली पदार्थांचे सेवन यांसारख्या सामाजिक दुष्प्रवृत्तींबरोबरच अनुसूचित जातींच्या विरूद्ध अस्पृश्यता, भेदभाव आणि अत्याचार यांचे निर्मूलन होईल, जेणे करून समाजातील सर्व घटक प्रतिष्ठेने व समानतेने जगू शकतील.

- २०११ च्या जनगणनेनुसार ५० टक्क्यांहून अधिक अनुसूचित जातींची लोकसंख्या असलेली ४६,८४४ गावे होती.

**वैशिष्ट्ये :**

i)या योजनेमध्ये अनु.जातीबहूल गावांच्या एकात्मिक विकासासाठी केंद्र व राज्यांच्या सर्व संबंधित योजनांची एकात्मिक अंमलबजावणी करण्याची तरतूद आहे.

ii)प्रत्येक गावाला २० लाख रूपयांचा निधी तफावत-भरू काढणारा निधी (gap-filling fund) म्हणून दिला जातो.

iii)गावाच्या विकासासाठी 'ग्राम विकास योजना' (Villag Development Plan) तयार केली जाईल.

## राष्ट्रीय आयोग
## (National Commissions)

**राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग** (National Commissi for Scheduled Castes: NCSC)

**उत्क्रांती:**

- वर्षानुवर्षे अत्याधिक सामाजिक, आर्थिक व शैक्षणि मागासलेपणात खितपत पडलेल्या काही विशिष्ट समुदायां भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४१ (१) आणि कलम ३ (१) अंतर्गत अनुक्रमे अनुसूचित जाती व अनुसूचित जम म्हणून अधिसूचित करण्यात आले.
- अनुसूचित जाती व जमातींच्या शोषणाविरूद्ध सुरक्षोपाय म्ह आणि त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आ सांस्कृतिक हितसंबंधांचे संरक्षण व प्रोत्साहन करण्यास घटनेमध्ये विविध विशेष तरतुदी करण्यात आल्या.
- या सुरक्षोपायांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मूळ घटने कलम ३३८ अंतर्गत एका विशेष अधिकाऱ्याची (Spec Officer) तरतूद करण्यात आली. त्यानुसार 'अनुसूचित ज व अनुसूचित जमातींसाठी आयुक्त' यांची निर्मिती करण्यात ये त्यांना अनु.जाती व जमातींच्या सुरक्षोपायांबाबत चौकशी व

राष्ट्रपतींना वार्षिक अहवाल देण्याची जबाबदारी देण्यात आली. आयुक्त कार्यालयाच्या प्रभावी कामकाजासाठी १७ प्रादेशिक कार्यालये स्थापन करण्यात आली.

- पुढे २१ जुलै, १९७८ रोजी प्रशासकीय निर्णयाने एक बहु-सदस्यीय 'अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी आयोग' स्थापन करण्यात आला. पहिल्या सदस्याचे अध्यक्ष श्री.भोला पास्वान शास्त्री हे होते.
- १ सप्टेंबर, १९८७ रोजी या आयोगाचे नाव बदलून 'राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोग' असे करण्यात आले. त्याची स्थापना एक राष्ट्र-स्तरीय सल्लागार मंडळ म्हणून करण्यात आली.
- १९९० मधील घटनेच्या ६५ व्या घटनादुरूस्तीने एक घटनात्मक आयोग 'राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोग' या नावाने स्थापन करण्यात आला. पहिला वैधानिक आयोग १२ मार्च, १९९२ रोजी स्थापन करण्यात आला. त्याचे अध्यक्ष श्री. राम धन हे होते. दुसरा आयोग ५ ऑक्टोबर, १९९५ रोजी श्री. एच. हणुमंथप्पा यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आला. तिसरा आयोग डिसेंबर, १९९८ मध्ये श्री.दिलिप सिंग भुरीया, तर चौथा आयोग मार्च, २००२ मध्ये डॉ.बिजॉय सोन्कर शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आला.
- घटनेची (८९ वी दुरुस्ती) कायदा, २००३ अन्वये १९ फेब्रुवारी, २००४ रोजी उपरोक्त राष्ट्रीय आयोगाच्या जागी दोन आयोग स्थापन करण्यात आले:-१)राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग (कलम ३३८), आणि २)राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग (कलम ३३८A)
- त्यानुसार पहिला राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग श्री. सुरज भान यांच्या अध्यक्षतेखाली, तर दुसरा २५ मे, २००७ रोजी डॉ. बुटा सिंग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आला. तिसरा राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग १८ नोव्हेंबर, २०१० रोजी डॉ.पी.एल.पुनीया यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आला आहे.

**आयोगाची कर्तव्ये आणि कार्ये:**

- राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग अनुसूचित जातींना प्रदान करण्यात आलेल्या घटनात्मक आणि वैधानिक सुरक्षोपायांवर लक्ष ठेवणे आणि त्यांच्या कल्याणाशी संबंधित मुद्यांवर लक्ष ठेवणे, यांसाठी जबाबदार आहे. घटनेच्या कलम ३३८(५) मध्ये दिल्याप्रमाणे आयोगाची कर्तव्ये पुढीलप्रमाणे:-

१)अनुसूचित जातींसाठी या संविधानाखाली किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली किंवा शासनाच्या कोणत्याही आदेशाखाली तरतूद करण्यात आलेल्या सुरक्षोपायांसंबंधीच्या सर्व बाबींचे अन्वेषण व संनियंत्रण करणे आणि अशा सुरक्षोपायांच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन करणे.

२)अनुसूचित जातींना हक्कांपासून आणि सुरक्षोपायांपासून वंचित केल्यासंबंधीच्या नेमक्या तक्रारींची चौकशी करणे.

३)अनुसूचित जातींच्या सामाजिक-आर्थिक विकासाच्या नियोजन प्रक्रियेमध्ये सहभागी होणे व सल्ला देणे आणि केंद्राच्या किंवा कोणत्याही राज्याच्या नियंत्रणाखालील त्यांच्या विकासाचे मूल्यामापन करणे.

४)या सुरक्षोपायांच्या अंमलबजावणीवरील अहवाल दरवर्षी आणि आयोगाला योग्य वाटेल अशा इतर वेळी राष्ट्रपतीला सादर करणे.

५)अशा अहवालामध्ये, केंद्राने किंवा कोणत्याही राज्याने, त्या सुरक्षोपायांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरता योजावयाचे उपाय आणि अनुसूचित जातींचे संरक्षण, कल्याण व सामाजिक व आर्थिक विकास याकरिता करावयाचे इतर उपाय याबाबत शिफारशी करणे.

६)अनुसूचित जातींचे संरक्षण, कल्याण व विकास आणि प्रगती यासंबंधात कोणत्याही संसदीय कायद्याच्या अधीन राहून, राष्ट्रपती विनिर्दिष्ट करतील अशी इतर कार्ये पार पाडणे.

**आयोगाचे अधिकार :**

- वरील कर्तव्ये व कार्यांची पूर्तता करता यावी यासाठी आयोगाला दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार आहेत. त्यानुसार आयोगास प्राप्त अधिकार पुढीलप्रमाणे-

१)भारताच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठवून बोलावणे व उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे.

२)कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेण्यास व तो सादर करण्यास भाग पाडणे.

३)शपथपत्रावर पुरावा स्विकारणे.

४)कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणत्याही सार्वजनिक अभिलेखांची किंवा त्याच्या प्रतीची मागणी करणे.

५)साक्षीदार व दस्तऐवज यांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे.

६)राष्ट्रपती नियमाद्वारे निश्चित करील, अशी इतर कोणतीही बाब.

**आयोगाची रचना :**

- हा आयोग अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि इतर तीन सदस्य यांचे मिळून बनलेला असतो.
- अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि इतर तीन सदस्य यांची नियुक्ती राष्ट्रपती आपल्या सहीशिक्क्यानिशी अधिपत्राद्वारे करतात. तसेच त्यां

लेलेल्या शर्ती व पदावधी राष्ट्रपती नियमांद्वारे करतात.

- आयोगाला आपल्या कार्यपद्धतीचे नियमन करण्याचा अधिकार असतो.
- मुख्यालय व राज्य कार्यालये: आयोगाचे कार्य नवी दिल्ली येथिल मुख्यालयातून आणि १२ राज्य कार्यालयांतून चालते- अगरतला, अहमदाबाद, बेंगळुरू, चंदिगढ, चेन्नई, गुवाहाटी, हैद्राबाद, कोलकाता, लखनौ, पाटणा, पुणे आणि थिरूवनंथपुरम.

## राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग (National Commission for Safai Karmacharies: NCSK)

- **स्थापना** : राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाची स्थापना १२ ऑगस्ट, १९९४ रोजी 'राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग कायदा, १९९३' अन्वये ३ वर्षांच्या कालावधीसाठी एक वैधानिक संस्था म्हणून करण्यात आली होती.
- १९९७ मध्ये आयोगाचा कार्यकाल संपल्यानंतर प्रथम २००२ पर्यंत व नंतर २००४ पर्यंत वाढविण्यात आला. त्यानंतर आयोगाचा कार्यकाल एक अवैधानिक संस्था म्हणून क्रमाक्रमाने सात वेळा वाढविण्यात येऊन सध्या ३१ मार्च, २०१९ पर्यंत वाढविण्यात आला.
- आयोगाचे एक अध्यक्ष व इतर चार सदस्य असतात, त्यापैकी एक महिला सदस्य असते.
- **कार्ये** : या आयोगाची स्थापना सफाई कर्मचाऱ्यांचे हक्क व हितसंबंध यांची जपणूक व प्रवर्तनासाठी करण्यात आली. या कायद्यान्वये सफाई कामगार म्हणजे असे व्यक्ती जे मानवी मल उचलण्याच्या किंवा स्वच्छता कार्यात गुंतलेले व्यक्ती होय. कायद्याच्या सेक्शन ३ नुसार आयेगाची कार्ये पुढीलप्रमाणे:-

१) समयबद्ध कृति योजनेद्वारे सफाई कर्मचाऱ्यांसाठी स्तर, सुविधा आणि संधींची असमानता दूर करण्यासाठी विशेष कृति कार्यक्रमांची भारत सरकारला शिफारस करणे.

२) सफाई कर्मचाऱ्यांच्या सामाजिक-आर्थिक पुनर्वसनाच्या योजना व कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचे अध्ययन करून मूल्यमापन करणे, आणि केंद्र व राज्य शासनांना अशा कार्यक्रम व योजनांच्या प्रभावी समन्वय व अंमलबजावणीसाठी शिफारस करणे.

)सफाई कामगारांच्या योजनांची अंमलबजावणी न होण्याशी संबंधित तक्रारींची चौकशी करून त्यांबाबत स्वयंप्रेरणेने कारवाई करणे.

सफाई कर्मचाऱ्यांना सहन कराव्या लागणाऱ्या कोणत्याही अडचणी किंवा निःसमर्थतांची चौकशी करून त्याबाबत केंद्र आणि राज्य शासनांना अहवाल देणे.

- या आयोगाकडे 'मॅन्युअल स्कॅव्हेंजर म्हणून रोजगारास प्रतिबंध आणि त्यांचे पुनर्वसन कायदा, २०१३' या कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी देण्यात आली आहे.

## राष्ट्रीय महामंडळे
## (National Corporations)

### राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (National Scheduled Caste Finance and Development Corporation: NSCFDC)

**स्थापना, मुख्यालय व भांडवल** :

- या महामंडळाची स्थापना ८ फेब्रुवारी, १९८९ मध्ये 'राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ' म्हणून भारत सरकारची पूर्ण मालकीची संस्था म्हणून करण्यात आली.
- पुढे भारत सरकारच्या आदेशाने या महामंडळाची विभागणी दोन स्वतंत्र महामंडळांमध्ये करण्यात आली: एक अनुसूचित जातींसाठी व दुसरा अनुसूचित जमातींसाठी. त्यानुसार राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ १० एप्रिल, २००१ पासून कार्यरत आहे.
- महामंडळ सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालयाअंतर्गत कार्य करते. त्याचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे.
- महामंडळाचे अधिकृत भांडवल १,५०० कोटी रूपये असून भागभांडवल सध्या १,२१८ कोटी रूपये आहे.
- **दूरदृष्टिकोन**: उद्योजकतेतून दारिद्र्याशी सामना
- **शासनादेश**: अनुसूचित जातींमधील दुप्पट दारिद्र्य रेषेखालील बेरोजगार व्यक्तींना स्वयंरोजगाराचे प्रकल्प स्थापन करण्यासाठी सुलभ वित्त पुरविणे आणि कौशल्य-प्रशिक्षणासाठी अनुदान देणे.
- **मुख्य उद्दिष्ट व कार्य**: हे महामंडळ दुप्पट दारिद्र्य रेषेखालील (सध्या ग्रामीण भागात ९८,००० रू., तर शहरी भागात १,२०,००० रू. प्रति वर्ष) अनुसूचित जातींच्या व्यक्तींच्या आर्थिक सबलीकरणासाठी वित्तपुरवठा करते. हे महामंडळ संबंधित राज्य/केंद्रशासित प्रदेशांनी नियुक्त केलेल्या राज्य चॅनेलाइझिंग एजन्सींच्या माध्यमातून लक्ष्य गटांच्या उत्पन्न निर्मिती योजनांना वित्त पुरवठा करते.
- **योजना**: महामंडळामार्फत सुमारे १२६ क्षेत्रांमधील प्रकल्पांना वित्त पुरवठा केला जातो. आयोगाच्या योजनांमध्ये:

i) पत-आधारित योजना (प्रकल्प खर्चाच्या ९० टक्क्यांपर्यंत कर्ज

आणि

ii)गैर-पतधारित योजना (कौशल्य विकास प्रशिक्षण, प्रदर्शने व विपणन प्रशिक्षण) यांचा समावेश होतो.

**राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ** (National Safai Karmachari Finance and Development Corporation: NSKFDC)

**स्थापना:**

- राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाची स्थापना २४ जानेवारी, १९९७ रोजी भारत सरकारच्या संपूर्ण मालकीची संस्था म्हणून 'नफ्यासाठी नसलेली कंपनी' म्हणून करण्यात आली. हे महामंडळ सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालयाअंतर्गत कार्य करते. हे महामंडळ सफाई कामगार आणि त्यांच्या आश्रितांच्या सर्वांगिण सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी सर्वोच्च संस्था म्हणून कार्य करते. महामंडळाचे मुख्यालय नवी दिल्ली येथे असून अधिकृत भांडवल ३०० कोटी रूपये आहे.
- **मिशन:** सफाई कर्मचारी व त्यांच्या आश्रितांना त्यांच्या पारंपरिक व्यवसाय, खालावलेली सामाजिक परिस्थिती आणि दारिद्र्य बाहेर काढण्यासाठी त्यांचे सबलीकरण करणे आणि त्यांना स्वयंप्रयत्नाने व आत्मसन्मानाने सामाजिक-आर्थिक प्रगती करण्यास मदत करणे.
- **उद्दिष्ट्ये:** स्कॅव्हेंजर्स/सफाई कर्मचाऱ्यांना त्यांच्या उत्पन्न निर्मिती कामांना कमी व्याज दराने वित्तीय साहाय्य करून त्यांचे सामाजिक-आर्थिक उत्थापन करणे आणि विद्यार्थ्यांना व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणासाठी कर्जे देणे. तसेच स्वच्छता कामे पूर्ण करण्यासाठी त्यांना तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण, गुणवत्ता नियंत्रण, तंत्रज्ञान दर्जावर्धन इत्यादी सेवा पुरविणे.
- **कार्ये:**

१)सफाई कर्मचाऱ्यांच्या आर्थिक विकास कामांचे प्रवर्तन करणे.

२)सफाई कर्मचाऱ्यांच्या फायद्यासाठी आणि/किंवा पुनर्वसनासाठी त्यांच्या स्वयं-रोजगाराच्या प्रकल्पांना राज्य/केंद्रशासित प्रदेशांनी निर्देशित केलेल्या राज्य चॅनेलायझिंग एजन्सींच्या माध्यमातून अनुदाने, साहाय्यक अनुदाने, कर्जे किंवा अग्रिमांच्या स्वरूपात मदत करणे.

३)सफाई कर्मचारी गटातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक किंवा तांत्रिक किंवा उच्च शिक्षणासाठी सुलभ कर्जे देणे.

४)सफाई कर्मचाऱ्यांना मदत करण्यासाठी सर्व राज्यस्तरीय महामंडळे, मंडळे किंवा एजन्सींच्या कामांच्या समन्वयासाठी सर्वोच्च संस्था म्हणून कार्य करणे.

- **योजना:** महामंडळामार्फत पुढील योजना चालविल्या जातात.

i)कर्जाधारित योजना: त्यामध्ये मुदती कर्ज योजना, महिला अधिकारिता योजना, महिला समृद्धी योजना, सूक्ष्म वित्त योजना, शिक्षण कर्ज, स्वच्छता उद्यमी योजना, सॅनिटरी मार्ट्स योजना, हरित व्यवसाय योजना इत्यादींचा समावेश होतो.

ii)गैर-कर्जाधारित योजना: त्यामध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण, जॉब मेळावे, वर्कशॉप्स इत्यादींचा समावेश होतो.

## प्रतिष्ठान
## (Foundations)

**डॉ. आंबेडकर प्रतिष्ठान** (Dr. Ambedkar Foundation)

**स्थापना:**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्म शताब्दी समितीने डॉ. आंबेडकरांच्या विचारांच्या प्रसारासाठी आंबेडकर प्रतिष्ठान स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार भारत सरकारने २४ मार्च, १९९२ रोजी डॉ. आंबेडकर प्रतिष्ठानाची स्थापना एक रजिस्टर्ड सोसायटी म्हणून नवी दिल्ली येथे करण्यात आली.

**उद्देश:**

- देशातील तसेच परदेशातील जनतेपर्यंत डॉ. आंबेडकरांची विचारप्रणाली आणि सामाजिक न्यायाबद्दलचा संदेश पोहोचविण्यासाठी कार्यक्रम व कृतीयोजनांची अंमलबजावणी करणे, हे या प्रतिष्ठानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.
- भाररत्न डॉ.बी.आर.आंबेडकर यांच्या शताब्दी महोत्सवादरम्यान ठरविण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण व दीर्घकालीन योजना व कार्यक्रमांचे व्यवस्थापन, प्रशासन व संचालनाची जबाबदारी या प्रतिष्ठानाकडे देण्यात आली आहे.

**रचना:**

- आमसभा प्रतिष्ठानाची सर्वोच्च संस्था आहे. सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्री हे आमसभेचे अध्यक्ष असतात. त्यात ११ पदसिद्ध सदस्य असून इतर ३२ नियुक्त सदस्य असतात.
- प्रतिष्ठानाच्या प्रशासकीय सभेकडे प्रतिष्ठानाचे निर्देशन, नियंत्रण आणि प्रशासनाची जबाबदारी आहे. तिचेही अध्यक्ष सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्री असतात.

**कामे:** प्रतिष्ठानाच्या कामांमध्ये पुढील प्रमुख कामांचा समावेश होतो-

१)विद्यापीठे/संस्थांमध्ये डॉ.आंबेडकर पीठे स्थापन करून बाबासाहेबांच्या विचारांवर संशोधन घडवून आणणे.

२)जनपथ येथे डॉ.आंबेडकर राष्ट्रीय पब्लिक लायब्ररीची स्थापन

कायदे (घटनादुरूस्ती कायदा व संसदीय कायदा) वैध असल्याचे घोषित केले.

**मागास वर्ग: अर्थ**

- राष्ट्रीय मागास वर्ग आयोग कायदा, १९९३ च्या सेक्शन २ नुसार, 'मागास वर्ग म्हणजे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींव्यतिरिक्त नागरिकांचे असे मागास वर्ग जे केंद्र सरकारने सूचीमध्ये यथा निर्देशित केले आहे.'
- वरील प्रयोजनार्थ, सेक्शन २ मध्ये 'सूची' म्हणजे अशी सूची जी केंद्र सरकारने नागरिकांच्या मागास वर्गांना (सरकारी सेवांमध्ये पर्याप्त प्रतिनिधित्व नसलेल्या) नियुक्तींमध्ये आरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आली आहे.

**इतर मागास वर्गाची केंद्रीय सूची** (Central List of OBCs)

- इंद्र साहनी विरूद्ध भारत संघराज्य खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या अनुषंगाने कर्मचारी व प्रशिक्षण विभागाने (DoPT)८ सप्टेंबर, १९९३ रोजी जाहीर केले की, पहिल्या टप्प्यात इतर मागास वर्गांमध्ये अशा जाती व समुदाय असतील जे दोन्ही सूचींमध्ये (अर्थात मंडल आयोगाच्या अहवालातील आणि राज्य सरकारांच्या सूचीतील) सामाईक आहेत. अशा मागास वर्गीय जाती व समुदायांची पहिली स्वतंत्र केंद्रीय सूची तत्कालिन सामाजिक कल्याण मंत्रालयाने १० सप्टेंबर, १९९३ रोजी १४ राज्यांसाठी जाहीर केली. पुढे ऑक्टोबर १९९४, मे १९९५ आणि डिसेंबर १९९७ मधील अधिसूचनांद्वारे इतर ७ राज्ये व ४ केंद्रशासित प्रदेशांसाठी सूची जाहीर करण्यात आली.
- १० सप्टेंबर, १९९३ रोजी जाहीर करण्यात आलेल्या सूचीपासून आजपर्यंत केंद्र सरकारने ४४ अधिसूचनांद्वारे २५ राज्ये व ६ केंद्रशासित प्रदेशांमध्ये मिळून एकूण २४९४ जातींना केंद्रीय सूचीमध्ये इतर मागास वर्ग म्हणून अधिसूचित केले आहे. (नागालँड व लक्षद्विपमध्ये मंडल आयोगाने तसेच राज्य/ कें.प्र.शासनाने कोणत्याही समुदायास इतर मागास वर्गाचा दर्जा दिलेला नाही. अरूणाचल प्रदेश, मेघालय आणि मिझोरम या राज्यांसाठी कोणतीही अधिसूचना करण्यात आलेली नाही. सर्वाधिक इतर मागास वर्गीय जातींची संख्या महाराष्ट्रात (२५५) आहे. त्यांनतर ओडिशामध्ये (१९८), कर्नाटक (१९७) आणि तमिळ नाडू (१८१) यांमध्ये आहेत.
- राष्ट्रीय मागास वर्ग आयोगाच्या सल्ल्यानुसार केंद्र सरकार इतर मागास वर्गांच्या सूचीमध्ये वेळोवेळी बदल करू शकते.
- जातीगत जनगणना १९३१ च्या जनगणनेनंतर बंद करण्यात आली. त्यामुळे इतर मागास वर्गांच्या लोकसंख्येची आकडेवारी उपलब्ध नाही. मात्र मंडल आयोगाने एकूण लोकसंख्येत त्यांचे प्रमाण ५२ टक्के असल्याचे सांगितले, तर अलिकडे राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटनेने आपल्या ६१ व्या सर्वेक्षणात (२००४-०५) हे प्रमाण ४१ टक्के इतके सांगितले.
- अलिकडे झालेल्या 'सामाजिक-आर्थिक आणि जातीगत जनगणना, २०११' चे आकडे प्रकाशित करण्यासाठी रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया (RGI) जबाबदार आहेत. मात्र या गणनेचे या बाबतचे अंतिम आकडे अजून प्रकाशित करण्यात आलेले नाहीत.

**घटनात्मक तरतुदी** (Constitutional provisions)

१) भारताच्या राज्यघटनेतील कलम १५ (४) अन्वये, राज्यसंस्थेस शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासहित सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गांच्या उन्नतीसाठी विशेष तरतुदी करण्याची संमती देण्यात आली आहे.

२) जानेवारी, २००६ मध्ये ९३ व्या घटनादुरूस्ती अन्वये कलम १५(५) समाविष्ट करण्यात आले. त्याआधारे 'केंद्रीय शैक्षणिक संस्था (प्रवेशात आरक्षण) अधिनियम, २००६' जानेवारी २००७ मध्ये संमत करण्यात आल्याने केंद्रीय शैक्षणिक संस्थांमध्ये इतर मागास वर्गीयांना २७ टक्के आरक्षण प्राप्त झाले.

३) कलम १६(४) ने "सार्वजनिक रोजगारात संधींची समानता" प्रदान केली आहे. त्यानुसार राज्यसंस्था नागरिकांच्या कोणत्याही मागास वर्गासाठी नियुक्तींमध्ये आरक्षणाची तरतूद करू शकते.

४) घटनेच्या कलम ३४० अन्वये, राष्ट्रपती आदेशाद्वारे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्गांच्या परिस्थितीचे अन्वेष करण्यासाठी एक आयोग स्थापन करू शकतात. मात्र इ मागास वर्गांच्या तक्रारींचे अन्वषेण करण्यासाठी स्वत आयोगाची कल्पना करण्यात आली नाही, म्हणून कलम ३ (१०) अंतर्गत स्थापन करण्यात आलेला राष्ट्रीय अनुसूचित ज आयोगावरच इतर मागास वर्गांच्या तक्रारींची पडताळ करण्याची जबाबदारी टाकण्यात आली.

१९९३ मध्ये एक वैधानिक 'राष्ट्रीय मागास वर्ग आ स्थापन करण्यात आला. तो बरखास्त करून त्याच्या घटनात्मक दर्जा असलेला आयोग स्थापन करण्याची प्र चालू आहे.

५) घटनेच्या कलम ३८(१) अन्वये, राज्यसंस्था लोककल प्रोत्साहन देऊन सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न आधारित समाज व्यवस्था निर्माण करण्यास प्रयत्नशील

६) घटनेच्या कलम ४६ अन्वये, राज्यसंस्था दुर्बल घ शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधांचे विशेष काळजी घेऊ

करेल.

**'क्रिमी लेयर' निकष ('Creamy Layer' Criteria)**

- इंद्र सहानी केसमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार इतर मागास वर्गाच्या आरक्षणाच्या लाभातून 'क्रिमी लेयर' ला वगळण्यात आले. 'क्रिमी लेयर' चे निकष सप्टेंबर, १९९३ मध्ये जाहीर करण्यात आले. त्यांनुसार पुढील ६ गटांना असमावेशतेचा नियम (rule of exclusion) लागू करण्यात आला:
  १.घटनात्मक पदे
  २.सेवा गट
  ३.सशस्त्र सेना, अर्ध-सैन्य दलासहीत
  ४.व्यावसायिक वर्ग आणि व्यापार व उद्योगातील व्यक्ती
  ५.संपत्तीचे मालक
  ६.आय/संपत्ती करदाते
- सहाव्या गटातील उत्पन्न मर्यादा १९९३ च्या आदेशामध्ये १ लाख रू.प्रति वर्ष इतकी होती, जी २००४ मध्ये २.५ लाख रू.प्रति वर्ष, ऑक्टोबर, २००८ मध्ये ४.५ लाख रू. प्रति वर्ष इतकी करण्यात आली. अलिकडे १६ मे, २०१३ रोजी ही मर्यादा ६ लाख रू. प्रति वर्ष इतकी करण्यात आली आहे.

## इतर मागास वर्गासाठी कल्याणकारी योजना (Welfare Schemes for OBCs)

- मागास वर्गासाठी शैक्षणिक व आर्थिक मदत अपर्याप्त असल्याचे, आणि त्यांच्यात व अमागास वर्गात सर्व स्तरांवर असमानता असल्याचे ध्यानात आल्याने मागास वर्गांचा विकास करण्यासाठी विभिन्न योजना सुरू करण्याची गरज निर्माण झाली.

**अ)शैक्षणिक सबलिकरणाच्या योजना**

- मागास वर्गाची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सर्वात महत्वाचा उपाय म्हणजे शिक्षणास सुलभ प्रवेशाबरोबरच त्यांच्या पारंपारिक ट्रेडसमध्ये प्रशिक्षण उपलब्ध करून देणे हा आहे. त्यासाठी पुढील योजना सुरू करण्यात आल्या:

**१)इतर मागास वर्गीयांसाठी मॅट्रिकपूर्व स्कॉलरशीप** (Pre-Matric Scholarship to the OBCs):

- ही स्कॉलरशीप रू.४४,५०० पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलांना राज्य शासन/कें.प्र.प्रशासनाने मान्यता दिलेल्या शैक्षणिक संस्थांमध्ये १ ते १० वी च्या विद्यार्थ्यांना दिली जाते. त्यासाठी राज्य शासनाला ५० टक्के, तर केंद्रशासित प्रदेशांना १०० टक्के केंद्रीय सहाय्य दिले जाते.

**२)इतर मागास वर्गीय विद्यार्थ्यांसाठी पोस्ट-मॅट्रिक स्कॉलरशीप** (Post-Matric Scholarship to the OBCs):

- मॅट्रिकनंतर किंवा माध्यमिक स्तरानंतर शिक्षण चालू ठेऊन पूर्ण करता यावे यासाठी १ लाख रूपयांपेक्षा पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलांना ही स्कॉलरशीप दिली जाते. ती संशोधन स्तरापर्यंतच्या शिक्षणासाठी दिली जाते. स्कॉलरशीपसाठी राज्य/कें.प्र.ना १०० टक्के केंद्रीय साहाय्य दिले जाते.

**३)इतर मागास वर्गीय मुलामुलींसाठी होस्टेल बांधण्यासाठी सहाय्य** (Construction of Hostel for OBC Boys & Girls):

- उच्च प्राथमिक, माध्यमिक, कॉलेज व विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी होस्टेल बांधण्यासाठी राज्य शासन/कें.प्र.शासन/केंद्र सरकारच्या संस्था/स्वयंसेवी संस्था यांना विविध प्रमाणात केंद्रीय साहाय्य दिले जाते. किमान १/३ होस्टेल्स केवळ मुलींसाठी बांधले जातात.

**४)इतर मागास वर्गीय विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय फेलोशीप** (National Fellowship for OBCs):

- भारत सरकाने ही योजना २०१४-१५ मध्ये सुरु केली होती.
- **उद्देश:** इतर मागास वर्गीय विद्यार्थ्यांना भारतीय विद्यापीठे, संशोधन संस्था व वैज्ञानिक संस्थांमध्ये एम.फिल व पी.एच.डी. सारखे संशोधनस्तरिय उच्च शिक्षण घेता येण्यासाठी त्यांना वित्तीय साहाय्याच्या स्वरुपात फेलोशीप उपलब्ध करून देणे. ही फेलोशीप विज्ञान, ह्युमॅनिटीज, सामाजिक विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान या विषयांमध्ये दिली जाते.
- **वैशिष्ट्ये :**

१)योजनेच्या अंमलबजावणीसाठी UGC ही नोडल एजन्सी आहे. UGC ने मान्यता दिलेल्या सर्व विद्यापीठे/संस्थांमध्ये ही योजना चालविली जाते.

२)सुरुवातीला विद्यार्थ्यांना दोन वर्षांची JRF (२५,००० रू. प्रति माह) प्रदान केली जाते. त्याची प्रगती चांगली असल्यास त्यास पुढील ३ वर्षांसाठी SRF (२८,००० रू. प्रति माह) प्रदान केली जाते.

**५)इतर मागास वर्ग व आर्थिक मागास वर्गाच्या विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी शैक्षणिक कर्जावरील व्याज अनुदानाची डॉ. आंबेडकर योजना** (Dr. Ambedkar Scheme of Interest Subsidy on Educational Loan for Overseas Studies for OBCs and EBCs):

- उद्देश: २०१४-१५ साली सुरू करण्यात आलेल्या या योजनेच

उद्देश इतर मागास वर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या मागास वर्गीय विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांची रोजगारक्षमता वाढविणे, हा आहे.

**वैशिष्ट्ये:**

i)प्रति वर्ष उत्पन्न ३ लाख रूपयांपेक्षा कमी असलेल्या इतर मागास वर्गीय, तर १ लाख रूपयांपेक्षा कमी असलेल्या आर्थिक मागास वर्गीय पालकांच्या मुलांना या योजनेचा लाभ प्राप्त होतो.

ii)दर वर्षी ५० टक्के लाभ मुलींसाठी दिला जातो.

iii)विद्यार्थ्याने परदेशात मास्टर, एम.फिल किंवा पी.एच.डी. कोर्सेला प्रवेश मिळविलेला असावा. त्यासाठी त्याने इंडियन बँक असोसिएशनच्या 'शिक्षण कर्ज योजने'अंतर्गत एखाद्या व्यापारी बँकेकडून कर्ज घेतलेले असावे.

iv)या कर्जावरील व्याज कर्ज कालावधीपर्यंत (कोर्सचा कालावधी + एक वर्ष किंवा नोकरी मिळाल्यानंतर ६ महिने, यांपैकी कमी कालावधी) भारत सरकामार्फत भरले जाते. त्यानंतरचे व्याज विद्यार्थ्याला भरावे लागते.

v)या योजनेसाठी 'कॅनरा बँके'ला नोडल बँक म्हणून घोषित केले जाहे.

**६)आर्थिक मागास वर्गीय विद्यार्थ्यांसाठी पोस्ट-मॅट्रिक स्कॉलरशीपची डॉ. आंबेडकर योजना** (Dr. Ambedkar Scheme of Post-Matric Scholarship for EBCs):

- ही २०१४-१५ पासून सुरू करण्यात आलेलर केंद्र-पुरस्कृत योजना आहे. ती राज्ये/केंद्रशासित प्रदेशांकडून राबविण्यात येते.
- मॅट्रिकनंतर किंवा माध्यमिक स्तरानंतर शिक्षण चालू ठेवणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास वर्गीय विद्यार्थ्यांना वित्तीय सहाय्य देणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. १ लाख रूपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलांना ही स्कॉलरशीप दिली जाते.

## ब)सामाजिक-आर्थिक सबलिकरणाच्या योजना

**१)इतर मागास वर्गांच्या कल्याणासाठी कार्यरत स्वयंसेवी संघटनांना साहाय्य** (Assistance to VOs Working for Welfare of OBCs):

- या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट स्वयंसेवी संघटनांना साहाय्य अनुदाने देऊन इतर मागास वर्गीयांच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याच्या प्रक्रियेत नागरी समाजास व स्वयंसेवी क्षेत्रास सहभागी करून घेणे हे आहे. त्यासाठी गैर-सरकारी संघटनांना विविध ट्रेड्समधील व्यावसासिक प्रशिक्षण देण्यासाठी वित्तीय साहाय्य दिले जाते.

**२)राष्ट्रीय मागास वर्ग वित्त व विकास महामंडळ** (National Backward Classes Finance and Development Corporation: NBCFDC):

- या महामंडळाची स्थापना १९९२ मध्ये एक 'ना नफा' कंपनी म्हणून करण्यात आली. हे महामंडळ मागास वर्गीय व्यक्ती व गटांचे तांत्रिक व उद्योजकीय कौशल्ये उंचावण्यासाठी त्यांच्या आर्थिक व वित्तीयदृष्ट्या सक्षम योजना व प्रकल्पांना वित्ताचे एक अतिरिक्त चॅनल उपलब्ध करून देते.
- जुले २०१५ पासून या महामंडळाची कर्जे दुप्पट दारिद्र्य रेषेपेक्षा कमी (सध्या ग्रामीण भागात ९८,००० रू., तर शहरी भागात १,२०,००० रू.) कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न असलेल्या इतर मागास वर्गीय व्यक्तींना प्राप्त होतात. कर्जे राज्य चॅनेलायझिंग एजन्सींच्या माध्यमातून दिली जातात.
- हे महामंडळ व्यापक उत्पन्न सृजक कामांना वित्त पुरवठा करते- कृषि व संलग्न क्षेत्रे, कारागिरी व पारंपरिक व्यवसाय, तांत्रिक ट्रेड्स, लघु व सूक्ष्म उद्योग, वाहतूक सेवा इत्यादी. दुप्पट दारिद्र्य रेषेखालील उद्योजकांना सुलभ अटींवरील कर्ज दिले जाते.
- महामंडळाच्या कर्ज योजना- मुदती कर्जे (महिलांसाठी नवीन स्वर्णिमा, शिक्षण कर्ज योजना, सक्षम, शिल्प संपदा), सूक्ष्म वित्त (सूक्ष्म वित्त योजना, महिला समृद्धी योजना, कृषि संपदा). तसेच महामंडळावर १७,५०० लाभार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण देण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

## राष्ट्रीय आयोग (National Commission)

**राष्ट्रीय मागास वर्ग आयोग** (National Commission for Backward Classes: NCBC)

**स्थापना :**

- मंडल आयोगाच्या निवाड्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार भारत सरकारने 'राष्ट्रीय मागास वर्ग आयोग कायदा, १९९३' संमत करण्यात आला.
- त्यानुसार भारत सरकारने १४ ऑगस्ट, १९९३ रोजी तीन वर्षांच्या कालावधीसाठी 'राष्ट्रीय मागास वर्ग आयोग' वैधानिक आयोग म्हणून स्थापन केला. आयोगाचे कार्यस्थान नवी दिल्ली होते.

**रचना :**

- आयोगामध्ये एकूण ५ सदस्य असतात- त्यापैकी एक अध्यक्ष (सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाचे न्यायाधीश), एक सदस्य सचिव (भारत सरकारच्या सेक्रेटरी पदाचे), एक समाज शास्त्र आणि मागास वर्गीयांबाबत विशेष ज्ञान असलेले दोन सदस्य असतात. प्रत्येक सदस्य तीन वर्षांच्या कालावधीसाठी

करेल.

- १९९३ नंतर एकूण सहा आयोगांना कार्य केले असून सध्या जून २००६ पासून सहावा आयोग स्थापन करण्यात आला आहे. त्याचे अध्यक्ष न्या.एम.एन.राव हे आहेत.

**कार्ये :**

१)आयोग कोणत्याही नागरिकांच्या समुदायास मागास वर्गाच्या सूचीमध्ये समाविष्ट करण्याबाबतच्या मागणीचे परीक्षण करणे, तसेच मागास वर्गाच्या सूचीमध्ये अति-समावेश किंवा न्यून-समावेश झाल्याबाबतच्या तक्रारींची चौकशी करून त्याबाबतचा सल्ला केंद्र शासनास देणे, हे प्रमुख कार्य करतो.

२) आयोगाचा सल्ला सामान्यत: केंद्र शासनावर बंधनकारक असेल.

**आयोग बरखास्त** (Abolition of Commission):

- या वैधानिक आयोगाच्या जागी घटनात्मक आयोग स्थापन करण्याच्या उद्दिष्टाने 'राष्ट्रीय मागास वर्ग आयोग (रद्दबातल) विधेयक, २०१७' संसदेत मांडण्यात आले आहे. ते अजून पारित झालेले नाही.

**घटना (१२३ वी दुरूस्ती) विधेयक, २०१७** (123rd Constitutional Amendment):

- राष्ट्रीय मागास वर्ग आयोगाला घटनात्मक दर्जा देण्यासाठी हे घटनादुरूस्ती विधेयक संसदेत मांडण्यात आले आहे. ते अजून पारित झालेले नाही.
- या आयोगाचे कार्य राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग आणि राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग या घटनात्मक आयोगांप्रमाणेच असेल. त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश असेल:

i)मागास वर्गीयांना घटनेने व इतर कायद्यांनी दिलेल्या सुरक्षोपायांची चौकशी करणे.

ii)त्यांच्या हक्कांच्या उल्लंघनाच्या घटनांची चौकशी करणे.

iii)मागास वर्गाच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीकरता सल्ला देणे व शिफारसी करणे.

## विमुक्त, भटक्या व अर्ध-भटक्या जमाती
### (Denotified, Nomadic and Semi-Nomadic Tribes: DNTs)

**अर्थ व व्याख्या**

**विमुक्त जमाती** (Denotified Tribes: DTs):

- ब्रिटिश सरकारने काही जमातींना गुन्हेगारी प्रवृत्तीच्या जमाती म्हणून अधिसूचित केले होते. त्यासाठी 'गुन्हेगारी जमाती कायदा, १८७१' (Criminal Tribes Act, 1871) पारित करण्यात आला होता. या कायद्यान्वये, जर स्थानिक शासनाला असे वाटले की, कोणतीही जमात, गँग किंवा लोकांचा गट अजामीनपात्र गुन्हे व्यवस्थीतपणे करण्याच्या अधीन आहे, तर गव्हर्नर जनरलच्या संमतीने त्यांना गुन्हेगारी जमात म्हणून घोषित करण्याचा अधिकार स्थानिक शासनास होता. या कायद्यात १९११ व १९२४ मध्ये बदल करण्यात आले.
- स्वातंत्र्यानंतर **अनंतसयानम अय्यंगार समितीच्या** शिफारसीनुसार 'गुन्हेगारी जमाती कायदे (रद्द)कायदा, १९५२' पारित करून १९२४ चा गुन्हेगारी जमाती कायदा रद्द करण्यात आला. तेव्हापासून या जमातींना 'विमुक्त जमाती' असे संबोधण्यात येते. अशा सुमारे १६३ जमाती विमुक्त करण्यात आल्या होत्या.

**भटक्या जमाती** (Nomadic Tribes: NTs):

- भटक्या जमाती म्हणजे असे लोक जे उपजिवीकेच्या शोधार्थ सतत भ्रमण करीत असल्याने त्यांना स्थायिक होण्यासाठी निश्चित जागा किंवा निवारा नसतो.

**अर्ध-भटक्या जमाती** (Semi-Nomadic Tribes):

- विशिष्ट ऋतूमध्ये एखाद्या निश्चित ठिकाणी राहणाऱ्या मात्र इत वेळी भ्रमण करणाऱ्या जमातींना अर्ध-भटक्या जमाती अ म्हणतात.
- बहुतेक विमुक्त/भटक्या/अर्ध-भटक्या जमाती अनुसूचित जा किंवा अनुसूचित जमाती किंवा इतर मागास वर्ग म्हणून वर्गीकृ करण्यात आल्या आहेत. मात्र त्यांपैकी काही जमाती यांपै कोणत्याही गटात टाकण्यात आलेल्या नाही. केंद्र स्तरावर सर्व जमातींना इतर मागास वर्ग या गटात घेण्यात आले अ

**विमुक्त व भटक्या जमातीची संख्या व लोकसंख्या:**

- रेंके आयोगाच्या अहवालानुसार (२००८) ज्या १५ राज्यांक आकडेवारी उपलब्ध होती त्यांमध्ये एकूण ३३४ विमुक्त जम होत्या. त्यांपैकी महाराष्ट्रात १४ होत्या (सर्वाधिक तमिळ नाडू ६८). त्यांपैकी १२ राज्यांमधील विमुक्त जमातींची लोकसं ४,३७,२३,०३४ इतकी होती.
- रेंके अहवालानुसार भटक्या जमातींची संख्या ८०९ होती, त्य महाराष्ट्रात १९ होती. सर्वाधिक संख्या तमिळ नाड कर्नाटकमध्ये (६८) होती. भटक्या जमातींची लोकसं ४,०४,५९,१३७ इतकी होती.
- देशातील ११६ विमुक्त जमातींचे (महाराष्ट्रातील ३), तर भटक्या जमातींचे (महाराष्ट्रातील ३८) वर्गीकरण अनुस जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा इतर मागास वर्ग कोणत्याही गटात झालेले नाही.

**विमुक्त, भटक्या व अर्ध-भटक्या जमातींसाठी राष्ट्रीय आयोग** (National Commission for Denotified, Nomadic and Semi-Nomadic Tribes: NCDNT)

- **रेंके आयोगः** विमुक्त व भटक्या जमातींच्या विकासासाठी उपाययोजना सुचिवण्यासाठी पूर्वी २००५ मध्ये बाळकृष्ण सिधराम रेंके यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय आयोग स्थापन केला होता. आयोगाने २००८ मध्ये दिलेल्या अहवालात आयोगाने विविध शिफारसी केल्या होत्या.
- रेंके आयोगाच्या शिफारसींचा विचार करून भारत सरकारने १२ फेब्रुवारी, २०१४ रोजी 'विमुक्त, भटक्या व अर्ध-भटक्या जमातींसाठी राष्ट्रीय आयोग' स्थापन केला. ९ जानेवारी, २०१५ रोजी आयोग अस्तित्वात आला असून तीन वर्षांच्या कालावधीसाठी कार्य करेल. आयोगाचे अध्यक्ष **भिकू रामजी इदाते** हे आहेत.

**शासनादेश** (Mandate):

- आयोगाला पुढील शासनादेश देण्यात आला आहेः

१) विमुक्त व भटक्या जमातींमधील जातींच्या राज्यनिहाय याद्या तयार करणे.

२) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास वर्गाच्या केंद्रीय व राज्य याद्यांमधील भटक्या व विमुक्त जमातींमधील जातींची ओळख करणे.

३) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास वर्गाची केंद्रीय यादी यांमध्ये समाविष्ट न करण्यात आलेल्या भटक्या व विमुक्त जमातींमधील जातींची ओळख करणे. तसेच त्यांना यांपैकी योग्य त्या यादीमध्ये समाविष्ट केले जाण्यासाठी प्रयत्न करणे.

४) भटक्या व विमुक्त जमातींच्या दाट लोकसंख्येच्या ठिकाणांची ओळख करणे.

५) विमुक्त व भटक्या जमातींच्या विकासाच्या प्रगतीचे मूल्यांकन करणे.

६) विमुक्त व भटक्या जमातींच्या विकाससाठी केंद्र व राज्यांनी घ्यावयाच्या उपायांची शिफारस करणे.

**विमुक्त व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकपश्चात स्कॉलरशीपची डॉ. आंबेडकर योजना** (Dr.Ambedkar Scheme of Pre and Post-Matric Scholarship for DNT Students)

- अनु.जाती, अनु.जमाती किंवा इतर मागास वर्गांमध्ये न येणाऱ्या वार्षिक २ लाख रूपयांपेक्षा कमी कुटुंबाचे उत्पन्न असणाऱ्या विमुक्त व भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी ही केंद्र-पुरस्कृत योजना २०१४-१५ साली सुरू करण्यात आली.
- योजना राज्ये/कें.प्र.च्या माध्यमातून राबविली जाते. खर्च विभागणी केंद्र व राज्यांमध्ये ७५:२५ या प्रमाणात केली जाते.
- पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना प्रति माह १०० रू., नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना १५० रू., तर पोस्ट मॅट्रिकसाठी वेगवेगळ्या कोर्सेसनुसार होस्टेलमध्ये राहणाऱ्यांसाठी १२०० ते ३८० रू, तर डे स्कॉलरसाठी ५५० ते २३० रू. प्रति माह स्कॉलरशीप दिली जाते.

**विमुक्त व भटक्या जमातींच्या मुलामुलींसाठी होस्टेल बांधण्यासाठी नानाजी देशमुख योजना** (Nanaji Deshmukh Scheme of Construction of Hostels for DNT Boys and Girls)

- अनु.जाती, अनु.जमाती किंवा इतर मागास वर्गांमध्ये न येणाऱ्या वार्षिक २ लाख रूपयांपेक्षा कमी कुटुंबाचे उत्पन्न असणाऱ्या विमुक्त व भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च शिक्षण घेता यावे यासाठी ही केंद्र-पुरस्कृत योजना २०१४-१५ साली सुरू करण्यात आली.
- योजना राज्ये/कें.प्र.च्या माध्यमातून राबविली जाते. खर्च विभागणी केंद्र व राज्यांमध्ये ७५:२५ या प्रमाणात केली जाते.
- केंद्र सरकारने देशभरात एकूण ५०० जागा संमत केल्या आहेत. प्रत्येक जागेसाठी ३ लाख रूपयांची तरतूद आहे.